CMYK

हळदी कुंकू महान भारतीय संस्कृतीचे : प्रतीक आमदार सिद्धार्थ खरात >> पान 2

राज्यात आर्टीफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) विद्यापीठाची होणार स्थापना >> पान 3

एसटी महामंडळाने तिकीटाचे दर वाढवले, भाडेवाढ रद्द करण्यासाठी ठाकरे गट आक्रमक >> पान 4

**सुविचार**

शांतपणे विचार करून घेतलेले निर्णय नेहमी योग्य ठरतात.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई




छावा सिनेमात झळकणार प्रसिद्ध मराठी अभिनेता, साकारणार 'ही' दमदार भूमिका..! आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 168 ■ बुधवार, दि. 29 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक एप्रिलमध्ये?

## कालची सुनावणी टळली, दोन्ही वकील सकारात्मक; आता २५ फेब्रुवारीची तारीख

**नवी दिल्ली : जवळपास गेल्या ४ वर्षांपासून लांबणीवर पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होते. सर्वोच्च न्यायालयात आज २३ व्या नंबरवर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व ओबीसी आरक्षण यांच्यातील याचिकेवर अंतिम सुनावणी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती.**

मात्र, पुन्हा एका तारीख पे तारीख पाहायला मिळाली आहे. राज्य सरकारच्यावतीने तुषार मेहता यांनी बाजू मांडली. त्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी नवी तारीख दिली असून पुढील सुनावणी २५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्यामुळे, आणखी जवळपास एक महिन्यानंतर ही सुनावणी होणार असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्याचं दिसून येत आहे. दरम्यान, दुसरीकडे राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली असून शिवसेनेकडून मुंबई महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा देखील केली आहे. मात्र, अजून काही काळ सर्वांनाच वाट पाहावी लागेल.

कोर्टाने कुठेही निवडणुकांना स्थगिती दिली नाही. पण, ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाकडे याबाबत निर्णय घेण्याची विनंती केली होती. त्यातच, आज न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासंदर्भात काही जणांना न्यायालयात धाव घेतली आहे. ओबीसी आरक्षण असो की नसो पण निवडणुका व्हाव्यात अशी मागणी या याचिकाकर्त्यांनी आहे. दरम्यान, राज्यात महायुतीचं सरकार आल्यानंतर,



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच व्हाव्यात यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते. राज्य सरकार म्हणून न्यायालयात बाजू मांडताना सर्वोच्च न्यायालयाकडून लवकरात लवकर अंतिम सुनावणी करावी अशी विनंती असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले होते. आता, याप्रकरणी आज झालेल्या सुनावणीत न्यायालयाने २५ फेब्रुवारी ही नवी तारीख दिली असून पुढील सुनावणी तेव्हाच होणार आहे. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणखी काही काळ पुढे ढकलण्यात आल्याचं दिसून येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांचे भविष्य असणार आहे. यावर्षी निकाल लागण्यासाठी सरकार शर्थीचे प्रयत्न करणार आहे. राज्यातील २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचे लक्ष आहे. तसेच, राजकीय पक्षांनीही मोर्चेबांधणी सुरू केली असून पक्षाचे मेळावे व बैठकांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना बळ दिलं जात आहे.

## चक्कः बुलढाण्यात फीटस इन फीटू; आईच्या पोटात बाळ आणि त्या बाळाच्या पोटात बाळ



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** देवाची करणी आणि नारळात पाणी असं म्हणतात ना त्यात तसला काही प्रकार बुलढाणा जिल्ह्यात दिसून आला आहे. आईच्या पोटात बाळ आणि त्या बाळाच्या पोटातही बाळ असेल असे शक्य नाही पन असे घडले आहेत. बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात तीन दिवसांपूर्वी एका गर्भवती महिला सोनोग्राफी साठी जिल्हा सामान्य रुग्णालयात आली असता हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही ३२ वर्षीय महिला असून तिला याआधी दोन अपत्य आहेत. निसर्गाने मानवाची अशा प्रकारे रचना केली आहे की विशिष्ट वयानंतर आणि शरीर रचनेत बदल झाल्यानंतर फक्त महिलाच प्रजनन करु शकतात. मात्र, आईच्या पोटात बाळ आणि बाळाच्या पोटात बाळ हा प्रकार पाहून डॉक्टरही अचंबित झाले. ९ महिन्याच्या बाळाच्या पोटात आणखी एक बाळ वाढत आहे. मेडिकल भाषेत अशा गर्भधारणेला 'फीटस इन फीटू' असे म्हणतात. अर्भकांमध्ये अर्भक असणे ही अशी घटना आहे. यात एका अर्भकाच्या पोटामध्ये दुसरे अर्भक वाढत असते. साधारणता ५ लाख गर्भवती महिलांमध्ये अशी केस एखादी आढळते. मात्र त्या बाळाचा जन्म झाल्यानंतर अडचणी निर्माण होऊ शकतात अशी प्रतिक्रिया जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.भागवत भुसारी यांनी दिली आहे.



## महाराष्ट्रात गीया बार्रे सिंड्रोमचा धसका! ८ दिवसात रुग्णांची शंभरी पार!

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात गीया बार्रे सिंड्रोमने शिरकाव केला असून यातील रुग्णसंख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. पुण्यात जीबीएसच्या संशयित रुग्णांची संख्या १११ वर पोहोचली आहे. यातील १७ रुग्णांची प्रकृती चिंताजनक आहे. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. १५०० हून अधिक घराचं निरीक्षण करण्यात आल असून ८ दिवसात रुग्णांची शंभरी पार केली आहे. राज्यात गीया बार्रे सिंड्रोम चे रुग्ण वाढत असल्याने आता केंद्र सरकारही अलर्ट मोडवर आहे.

२५ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्रात गीयन बारे सिंड्रोम (जीबीएस) या दुर्मिळ आजाराचे ७३ रुग्ण सापडले होते. यातील ७० रुग्ण पुणे जिल्ह्यात होते, तर ३ रुग्ण इतर जिल्ह्यात होते. या रुग्णांपैकी १४ रुग्ण व्हेंटिलेटरवर होते. गीया बार्रे सिंड्रोम मुळे आजारी पडणाऱ्या रुग्णांच्या संख्येत होत असलेल्या लक्षणीय वाढीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने तज्ज्ञांचे सात सदस्यीय पथक नेमले आहे. महाराष्ट्रातील आरोग्याची ही समस्या हाताळण्यासाठी केंद्र सरकारने उच्चस्तरीय समिती नियुक्त केली आहे. ही समिती राज्य सरकारला या आजाराच्या रुग्णांचे व्यवस्थापन आणि नियंत्रण यात मदत करेल. याचबरोबर राज्य सरकारच्या उपाययोजनांवरही ही समिती लक्ष ठेवेल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

## केसरकरांना दे धक्का; पुस्तकांना वह्यांची पाने लावण्याचा शासन निर्णय रद्द

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे शिक्षणमंत्री म्हणून शिवसेना नेते दीपक केसरकर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर काही महत्त्वाचे निर्णय घेतले होते. त्यामध्ये, एक राज्य एक गणवेश आणि पुस्तकांना वह्यांची पाने लावण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. शालेय शिक्षणात राज्य सरकारच्या या निर्णयाची चांगलीच चर्चा रंगली. मात्र, आता दीपक केसरकर यांचे मंत्रीपद गेल्यानंतर आणि राज्यात महायुतीचं नवं सरकार स्थापन झाल्यानंतर राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने तो निर्णय रद्द केला आहे. पुस्तकाला वह्यांची पानं लावण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने वर्षभरातच घेतला मागे घेण्यात आला आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरी ते आठवी या वर्गासाठी असलेल्या पाठ्यपुस्तकांना वह्यांची पाने लावण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला होता. मात्र, यंदाच्या वर्षापासून तो निर्णय मागे घेण्यात आल्याने आता विद्यार्थ्यांना वह्याच्या पानांशिवाय पुस्तके मिळणार आहेत



### पूर्वीप्रमाणेच पाठ्यपुस्तकांचे वितरण

शिवसेना नेते दीपक केसरकर हे मंत्री असताना राज्य सरकारने पुस्तकांना वह्याची पानं लावण्याचा निर्णय घेतला होता. विद्यार्थ्यांच्या दफ्तराचं ओझं कमी करण्याचा आणि पुस्तकातच महत्त्वाच्या नोंदी लिहिण्याचा उद्देश ठेऊन हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, वर्षभरातच हा निर्णय मागे घेण्याची वेळ शालेय शिक्षण विभागावर आली आहे. सदर योजनेचा शालेय शिक्षण विभागाकडून आढावा घेतला असता, पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या वह्यांच्या कोऱ्या पानांचा विद्यार्थ्यांकडून शिकविलेल्या घटकांच्या नोंदी घेण्यासाठी अपेक्षेप्रमाणे उपयोग झाल्याचे दिसून आले नाही. तसेच सदर योजनेचा उद्देश हा दप्तराचे ओझे कमी करणे असा होता, परंतु विद्यार्थी पुस्तके व सोबत वह्या देखील घेऊन येत असल्याचे तसेच पाठ्यपुस्तकांमधील कोऱ्या पानांचा शैक्षणिक नोंदी घेण्याकरिता वापर होत नसल्याचे आढळून आले आहे. एकंदरीत, शालेय शिक्षण विभागाला सदर योजनेचा अपेक्षित उद्देश फारशा प्रमाणात सफल झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे, हा निर्णय मागे घेण्यात आला असून पूर्वीप्रमाणे पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना वितरित केली जातील, असेही नव्या आदेशात म्हटले आहे.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी राज्य सरकारच्या'एक राज्य एक गणवेश' योजनेतही बदल करण्यात आले आहेत. एक राज्य एक गणवेश ही योजना सुसूत्रतेअभावी योजना फसल्याचे सांगत या योजनेतही बदल करण्यात आले असून मोफत गणवेश योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीकडे देण्यात येणार आहे. त्यामुळे, थेट लाभार्थी योजनेअंतर्गत शाळा समितीकडे निधी दिला जाणार असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र सुरू होताच योग्य मापाचे गणवेश मिळणार आहेत. विशेष म्हणजे हाही निर्णय दीपक केसरकर हे शिक्षणमंत्री असताना घेण्यात आला होता. मात्र, हे दोन्ही निर्णय यंदाच्या वर्षापासून बदलण्यात आले आहेत.

## राज्यातील पहिले छत्रपती शिवाजी महाराजांचं मंदिर पूर्णत्वास, दीड एकर जागेत गडकोट किल्ल्यांसारखी तटबंदी

**ठाणे/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज यांचे महाराष्ट्रातील पहिले मंदिर भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा या ठिकाणी साकारले जात आहे. येत्या १७ मार्च रोजी शिवरायांच्या तिथीनुसार प्राणप्रतिष्ठा आणि मंदिराचे लोकार्पण करण्यात येणार आहे. त्यासाठी भव्यदिव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांनी दिली. महाराजांचे हे मंदिर गडकोट किल्ल्यांसारखे दिसावे म्हणून दीड एकर जागेत उभारलेल्या मंदिराच्या भोवती तटबंदी आणि भव्य प्रवेशद्वार उभारण्यात आलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचं भूमीपूजन ४ मार्च २०१८ मध्ये झाले होते. मात्र, मध्यंतरीच्या कोरोना काळातील लॉकडाऊनच्या संकटामुळे उशीर झाला. असे असले तरी अधिक जोमाने काम सुरू केले. हे मंदिर फक्त दर्शनस्थळ न बनता शक्तीपीठ असावे. महाराजांचे जीवन समाजातील सर्व वर्गासाठी प्रेरणादायी राहील, हे लक्षात घेऊन मंदिर उभारणीचा संकल्प केला होता, अशी माहिती शिवक्रांती प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांनी दिली आहे.

# पुतळे गावांची शोभा म्हणून नाही तर युवा पिढीने आदर्श घ्यावा यासाठी - केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ







*मेहकर/प्रतिनिधी :*छत्रपती शिवरायांसह इतर महापुरुषांचे पुतळे निश्चित उभारा ,परंतु ते गावाची शोभा म्हणून नाही तर महापुरुषांच्या जीवन चरित्रातून युवा पिढीने आदर्श घेण्यासाठी उभारा ,असे विचार केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले लावणा येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवरायांच्या अश्र्वारूढ पुतळ्याच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते.

माजी आमदार संजय रायमुलकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर ,दिलीपराव देशमुख, बाजार समितीचे माजी सभापती मधुकरराव रहाटे, दत्ता पाटील शेळके, अशोक पसरटे ,शरद धोटे ,बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, मोळी येथील सरपंच प्रभाकर नागरिक, शाम रहाटे, किसनराव टाले, सरपंच भारत बोबडे, सुधाकर वानखेडे ,पोलीस पाटील देवानंद ढगे, भोसा येथील सरपंच दिनकर चव्हाण ,मोळा येथील सरपंच विजय शेळके प्रामुख्याने उपस्थित होते.

पाहुण्यांचे स्वागत सचिन चैताणे, शरद टाले, हनुमान शेवाळे, प्रतीक मेटांगळे, भारत काटकर, अंबादास ढगे आदींनी केले. छत्रपती शिवरायांच्या अश्र्वारूढ पुतळ्याचे विधिवत पूजन करून प्रतापराव जाधव संजय रायमुलकर यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. आपल्या भाषणात नामदार जाधव पुढे म्हणाले की, चारी बाजूंनी शत्रू असताना धर्म ,संस्कृतीचे जतन आणि स्वराज्य उभारण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले .मराठ्यांनी दिल्लीचे तख्त जिंकले, यामागे प्रेरणा शिवरायांचे होती. सर्व जाती धर्माच्या लोकांचा समावेश शिवरायांच्या सैन्य दलात होता. या सैनिकांना मावळा म्हटले जायचे. मावळा ही सर्वांची एकच ओळख होती. आपल्या सर्वांची ओळख अमुकतमुक जातीचे म्हणून नव्हे तर हिंदू म्हणून असली पाहिजे, असेही ते म्हणाले.

महायुती सरकारच्या माध्यमातून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शेतकरी, महिला, विद्यार्थी ,कामगार अशा सर्व घटकांसाठी योजना आणल्या गेल्या त्याचा आर्थिक फायदा सर्व घटकांना मिळाला, असे सांगून प्रतापराव जाधव म्हणाले की, पिक विमा चा एकरी अडीच हजार ते ३ हजार खर्च होता. शेतकरी तो करू शकत नव्हता. म्हणून मुख्यमंत्री शिंदे यांनी एक रुपयात पिक विमा योजना आणली हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. किसान सन्मान योजना, पिक विमा ,अतिवृष्टीमुळे नुकसान भरपाई आदी अनेक प्रकारांनी शेतकऱ्यांच्या खात्यात मोठ्या प्रमाणात पैसे आले. लाडकी बहीण योजना, महिला बचतगट ,महिलांना एसटी प्रवास भाड्यात सवलत,

मुलींसाठी उच्च शिक्षण मोफत या गोष्टी महिला सक्षमीकरणासाठी शासनाने केल्या.

उबाठाचे नवीन आमदार उठसूठ आश्वासने देत सुटले आहेत त्याबद्दल बोलताना ना. जाधव म्हणाले की, नवीन मुल्ला काही दिवस अल्ला अल्ला करतो तसा हा प्रकार आहे. मतदार संघाची ते काय वाट लावणार हे पुढे दिसणारच आहे. केंद्रात व राज्यात महायुतीची सत्ता आहे. पण इथे लोकांनी बैल व हल्लूया असे औत मेहकर विधानसभा मतदारसंघात जुंपून दिले आहे, असा मिश्किल टोलाही त्यांनी लगावला. आपल्या भाषणात माजी आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, मतदार संघात डांबरी व सिमेंट रस्ते मोठ्या प्रमाणावर करण्यात आले आहेत. अमडापूर जानेफळ बेलगाव केनवड हा ३९० कोटींचा रस्ता, मेहकर ते रिसोड मेहकर ते रिसोड १७५ कोटींचा रस्ता आणि शेंदुर्जन सुलतानपूर वेणी मोप १९० कोटींचा रस्ता तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने मंजूर करून घेतले असून या रस्त्यांचे काम सुरू झालेले आहे. पराभूत झालो असलो तरी यापुढेही जनतेच्या सेवेत मी कायम राहणार आहे. सरकार आपले असल्याने विकासाची कामे सातत्याने सुरूच राहतील.

यावेळी दिलीपराव देशमुख यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला संजय मेटांगळे, बालाजी गवळी ,सुनील टाले ,शिवाजी हातेकर ,गजानन शेळके, विजय जाधव, गणेश अंभोरे ,शुभम टाले, वैभव अंभोरे, अविनाश ढगे, विजय मेटांगळे ,संदेश ढगे, सज्जन धोटे, अनिल काटकर, शरद वानखेडे ,उत्तम ढगे ,शंकर वानखेडे, गजानन बोडखे ,दीपक टाले, अविनाश टाले ,निलेश टाले, शुभम ताकतोडे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष शेवाळे यांनी केले.

CMYK

## एसटीची भाडेवाढ योग्य की अयोग्य?

'एसटी बसच्या भाडेवाढीवरून विरोधी पक्ष कंठशोष करीत आहे. विरोधी पक्षाला चर्चेत राहायचे असेल तर भाडेवाढीसारखे मुद्दे उचलून धरावे लागतात. जमले तर जमले नाहीतर गंगेत सोडून दिले, असे धोरण राजकीय पक्षांचे असते. जनतेच्या प्रतिसादावर ते अवलंबून आहे. माझ्या मते एसटीची भाडेवाढ योग्य आहे. एसटी महामंडळ सध्या ज्या स्थितीत आहे, त्यातून त्याला बाहेर काढायचे असेल तर चांगल्या सुधारणांची गरज आहे. सगळे सौंग व जमतात, पैशाचे सोंग आणता येत नाही, नेमके हेच एसटीला लागू होते. पैसा र नसला की उत्तम सुविधा देता येत नाही. एसटीचे तसेच झाले आहे. कर्मचाऱ्यांचे पगार करण्याइतका पत्र पैसा ज्या एसटी महामंडळाकडे सलग गोळा होत नाही, ते जनतेला अपेक्षित सुविधा देऊ शकत नाही, हे वास्तव समजून घेतले पाहिजे, निम्म्यापेक्षा जास्त बसेस भंगार अवस्थेत आहे. प्रवास करताना अनेक प्रवासी महामंडळाच्या नावाने बोटे मोडतात. प्रवासा दरम्यान बस अचानक बंद पडल्याच्या घटना दररोज घडतात. बसस्थानकांची स्थिती वाईट आहे, अशी जेमतेम स्थिती असताना जवळपास ६० टक्के लोकांना सवलतीच्या प्रवासाची मुभा देण्यात आली आहे. या निर्णयाने प्रवासी वाढते, पर्यायाने उत्पन्न वाढले पण, हे उत्पन्न कामापुरते असून ते एसटीचा चेहरामोहरा बदलवू शकत नाही. बदलवायचा असेल तर तुम्हाला उत्पन्न वाढविल्याशिवाय दुसरा उपाय नाही. एसटीच्या भाडेवाढीकडे त्या दृष्टिकोनातून पाहावे लागेल, मागील तीन वर्षांपासून भाडेवाढ प्रस्तावित होती. त्याला राज्य परिवहन प्राधिकरणाने अखेर मंजुरी दिली. १४.९५ टक्के ही दरवाढ आहे. ती लागू झाली आहे. गेल्या तीन वर्षांत एसटीची नियमित भाडेवाढ झालेली नाही. मात्र, त्याचवेळी कर्मचाऱ्यांच्या वेतनात नियमित वाढ झाली. इंधनाच्या किमतीत झालेली वृद्धी आणि इतर नियमित खर्चामध्ये वाढ झाल्याने महामंडळावर आर्थिक भार वाढला. परिणामस्वरूप नियमानुसार दरवाढ करणे क्रमप्राप्त झाले होते. तेव्हाच आर्थिक समतोल साधला जाऊ शकतो. चांगले गुळगुळीत रस्ते पाहिजे असेल तर टोल्टॅक्स भरावा लागतो, हे जवळपास सर्वांनीच मान्य केले आहे. तेच सूत्र एसटीलाही लागू आहे. समाधान होईल, इतक्या सुविधा पाहिजे असतील तर पैसे मोजावे लागतील, हे व्यावहारिक ज्ञान असलेला कोणताही माणूस स्वीकारेल. विद्यमान भाडेवाढ जनतेने जवळपास स्वीकारल्याचे दिसते. कारण, विरोधकांच्या आंदोलनाला मिळत नसलेल्या प्रतिसादावरून ते लक्षात येते. एसटीची भाडेवाढ जरी झाली असली तरी इतर प्रवासी वाहतुकीपेक्षा हा प्रवास माफकच आहे. त्यातही महिला, ज्येष्ठ नागरिक व विविध वर्गवारीतील प्रवाशांना तर मोठी सवलत आहे. त्यांच्यावर भाडेवाढीने फार भुर्दंड पडेल अशी स्थिती नाही. उलट थोडे जादा पैसे देऊन एसटीचा प्रवास सुखकर होत असेल तर प्रत्येक व्यक्ती त्याचे स्वागत करेल. भाडेवाढ झाल्या बरोबरच सर्व सुविधा मिळतील, असेही नाही. काहीवेळ त्यांना द्यावा लागेल. एसटीने पुढील पाच वर्षांत एकूण २५ हजार बसेस खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. या बसेस राज्य सरकारच्या मालकीच्या असतील. नुकत्याच झालेल्या आढावा बैठकीत पुढील पाच वर्षांचे बस खरेदीचे नियोजन करण्यात आले आहे. २०२९ पर्यंत महामंडळाकडे ३० हजार बसेसचा ताफा असेल. त्यात पाच हजार बसेस इलेक्ट्रिक असतीत महाराष्ट्रातील प्रत्येक गावांत बससेवा प्रदान करणे, असे एसटीचे नियोजन आहे. सध्या १४ हजार ३०० बसेस एसटीकडे आहे. त्यापैकी १० हजार बसेस १० वषपिक्षा जास्त जुन्या आहेत. या बसेस पुढील तीन ते चार वर्षांत सेवेतून काढण्यात येतील. त्यामुळे नवीन बसेसची गरज निर्माण होणारच आहे. ही निकड लक्षात घेऊन पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत दरवर्षी पाच हजार आणि पुढील पाच वर्षात २५ हजार बस खरेदी करण्याच्या महामंडळाच्या प्रस्तावाला अर्थमंत्री अजित पवार व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तत्काळ मान्यता दिली आहे. गाव तेथे एसटी बस चांगल्या सुविधांसह पोहोचवायची असेल तर पैसे खर्च करावे लागतील. ते गोळा करायचे असतील तर जनतेलाही भाडेवाढीतून योगदान द्यावे लागेल, सरकारने व महामंडळाने योगदानाची तयारी ठेवलीच आहे. आता जनतेने कोणाच्याही भूलथापांना बळी न पडता सहकार्याच्या भावनेतून पुढे जाणे, हेच योग्य आहे.

# हळदी कुंकू महान भारतीय संस्कृतीचे : प्रतीक आमदार सिद्धार्थ खरात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** महिला आघाडी शिवसेनेच्या वतीने हळदीकुंकू समारंभ. व लोकप्रिय लोकनेते आमदार सिद्धार्थ खरात यांचा मेहकर शिवसेना महिला आघाडी (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षा कडून सत्कार करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या प्रमाणात हळदी कुंकवाचा कार्यक्रम मेहकर शहर येथे करण्यात आला सौ. पौर्णिमा ताई संदीप गवई. शहर प्रमुख महिला आघाडी. मेहकर यांच्या वतीने हा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमांमध्ये फार मोठ्या प्रमाणात महिलांनी प्रतिसाद दिला आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील म्हणजेच घरकामापासून शिवण क्लास आणि इतरही छोट्या मोठ्या उद्योग काम करणाऱ्या महिलांनी भाग घेतला या कार्यक्रमामध्ये विशेषता विधवा महिला यांनी सुद्धा मोठ्या प्रमाणात उपस्थिती





दर्शविली होती.आणि या माध्यमातून हळदीकुंकवाच्या कार्यक्रमातून होतकरू महिलांचा सत्कार माननीय नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी महिलांचा सत्कार करण्यात आला त्यांना प्रोत्साहन देऊन. मी तुमचा भाऊ या नात्याने माझ्याकडे तुमच्या कोणत्याही अडीअडचणी असतील त्या सांगा मी त्या सोडवण्याचा पुरेपूर प्रयत्न करीन. पुढे बोलताना आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले आपल्या देशामध्ये पाश्चिमात्य संस्कृती वर डोके काढू पाहत आहे. परंतु हळदी कुंकू महान भारतीय संस्कृतीचे प्रतीक असून आपण भारतीय संस्कृतीचा महान वाटा आपण जोपासण्याचा प्रयत्न करित आहे असे प्रतिपादन आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले.

यावेळी विधवा परितक्ताया महिलांनाच नाही तर विविध क्षेत्रातील काम करणाऱ्या महिलांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. महिला उपस्थितीमध्ये विजयाताई खडसान जिल्हाप्रमुख महिला आघाडी नगमा गवळी विधानसभा संपर्कप्रमुख. तारामती जायभाये तालुका उपप्रमुख महिला आघाडी लोणार. स्वाती नवले. तालुकाप्रमुख महिला आघाडी निर्मला गवई सरपंच.सत्यभामा गारोळे मा. नगरसेवक. संगीता माने मा. नगरसेवक. आरती ताई देशमुख. रूपाली गारोळे. सपना गारोळे. ॲड. अंजली जाधव. ॲड. अंजली देशमुख ॲड. ईशिता डोंगरदिवे. गजश्री बोडखे. गोदावरी तोर. प्रतिभा देशमुख. नम्रता चनखोरे. दिपाली गारोळे. पुष्पा कंकाळ. नीता देशमुख. शुभांगी निकस. लता मानवतकर. सुलोचना दुतोंडे. अनिता खरात. नयना वसवकर. सुमती घुगे. उषा आंभोरे. जया राऊत.सुनिता वसवकर. अनिता बाजड. कमल उबाळे. इंदू बाजड. रत्ना साबळे. उज्वला मानवतकर. सुशीला गायकवाड. कल्पना आंभोरे. रंजना पखाले. शकुंतला गवई. वैशाली वानखेडे. कविता रणाईत. सुमित्रा चौधरी. संगीता सुरुसे. नूतन तोर. विमल मानवतकर. शारदा गवई.लीला जाधव. लीला गवांदे. शारदा धोंडगे. मालता अवसरमोल. कल्पना कटारे. शोभा गाडेकर. कुसुम तेलंग. शारदा काळे. माया तेलंग. तारामती नागरे. कौशल्या गवई.रीना वानखेडे. पुनम आराख. सुनंदा अवसरमोल. अनिता खरात. किरण तेलंग. दीक्षा वानखेडे. शिवकन्या मानवतकर. प्रयागबाई शिंदे. अर्चना काळदाते. कमल गवई. सविता गवई.व शिवसेना महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन सौ. पौर्णिमा संदीप गवई. मेहकर शहर प्रमुख महिला आघाडी यांनी केले होते

# बीबि येथे प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना अंतर्गत विविध स्पर्धा संपन्न



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** लोणार तालुक्यातील बिबि येथे पंतप्रधान कृषी सिंचन योजना ड्रिॊ २.० अंतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रामुख्याने वसंतरावजी नाईक कनिष्ठ महाविद्यालय बीबी येथील शाळेमध्ये निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या तर दिनांक २७ जानेवारी रोजी येथील संतोषी माता मंदिराच्या प्रांगणामध्ये रांगोळी स्पर्धा व वृक्षारोपण चा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी गावातील महिलावर्ग मुलींनी मोठा सहभाग घेतला होता या विविध स्पर्धेच्या वेळी विद्यार्थी व गावातील महिला पुरुष वर्गांना पंतप्रधान कृषी सिंचन योजनेची माहिती कृषी मंडळ अधिकारी अनिल सांगळे कृषी पर्यवेक्षक विलास जाधव साहेब यांनी मार्गदर्शन केले यावेळेस प्रामुख्याने सरपंच चंदाबाई गुलमोहर रामराव इंगळे समूह संघटक रामेश्र्वर सोनकांबळे सिविल इंजिनिअर श्रीकांत भुमरे कृषी सहाय्यक कविता साखरे सचिव प्रामुख्याने उपस्थित होते

## पालकमंत्र्यांच्या दौऱ्यात भाजपमधील गटबाजी उघड

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात काँग्रेसप्रमाणेच भाजपलाही गटबाजीचे ग्रहण लागले आहे. पालकमंत्री डॉ. प्रा. अशोक उईके यांच्या पहिल्याच दौऱ्यात ही गटबाजी चव्हाट्यावर आली. माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार समर्थकांनी विश्रामगृह येथे पालकमंत्र्यांचे स्वागत केले, तर आमदार किशोर जोरगेवार यांनी सत्कार सोहळ्याचे आयोजन केले. या सत्कार सोहळ्यात मुनगंटीवार विरोधक एकत्र आले, तर समर्थकांनी त्याकडे पाठ फिरवली.

पालकमंत्री उईके यांचा २५ जानेवारीला शहरात दौरा झाला. मुनगंटीवार समर्थकांनी शासकीय विश्रामगृहात पालकमंत्र्यांच्या स्वागताचा कार्यक्रम आयोजित केला. यावेळी आमदार देवराव भोंगळे, जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा, शहराध्यक्ष राहुल पावडे यांच्यासह इतर पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते उपस्थित होते. दुसरीकडे, प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सभागृहात जोरगेवार यांच्या नेतृत्वात सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, आमदार कीर्तीकुमार भांगडिया, करण देवतळे आणि माजी मंत्री शोभा फडणवीस हे भाजपतील मुनगंटीवार विरोधक नेते उपस्थित होते. म ुनगंटीवार समर्थकांनी मात्र या कार्यक्रमाकडे पाठ फिरवली. यामुळे भाजपमधील गटबाजी चव्हाट्यावर आली.

दरम्यान, भाजपतील गटबाजीबाबत पालकमंत्री उईके यांना प्रश्न विचारला असता त्यांनी थेट हात जोडले. कुठे गटबाजी आहे, मला तर दिसली नाही. सर्व नेते एकत्र दिसले. जिल्ह्यातील वातावरण बिघडवू नये, असे म्हणत त्यांनी यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. यामुळे आगामी काळात भाजपतील गटबाजी थोपवण्याचे आव्हान पालकमंत्री उईके यांच्यासमोर असेल.

जिल्हा बँक नोकरभरतीप्रकरणी बैठकीचे आश्वासन

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नोकरभरतीत आरक्षण लागू करावे, या मागणीसाठी भाजप ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष मनोत पोतराजे उपोषणावर बसले आहेत. उईके यांनी त्यांची भेट घेतली. याबाबत मुख्यमंत्र्यांना भेटून हा प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिले. यावेळी माजी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार किशोर जोरगेवार, आमदार देवराव भोंगळे यांच्यासह आरक्षण बचाव संघर्ष कृती समितीचे सदस्य उपस्थित होते. दरम्यान, मनसेचे सचिन भोयर यांनी प्रजासत्ताकदिनी चंद्रपूर जिल्हा बँकेसम ोर बनावट नोटांचा पाऊस पाडून अनोखे आंदोलन केले.

## छावा सिनेमात झळकणार प्रसिद्ध मराठी अभिनेता, साकारणार 'ही' दमदार भूमिका..!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आपल्या इतिहासावर आधारित अनेक सिनेमे बनत असतात. आत्तापर्यंत अनेक ऐतिहासिक सिनेमे बऱ्याच भाषांमध्ये बनले आहेत आणि यापुढेही काही प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. असाच एक सिनेमा लवकर बॉक्स ऑफिसवर धडकणार आहे मात्र, रिलीजआधीच सिनेमा प्रचंड चर्चेत आहे. या सिनेमाचं नाव आहे 'छावा'. छत्रपती शिवाजी महाराजांचे सुपुत्र संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक चित्रपट छावा लवकरच रिलीज होणार आहे. या सिनेमात मराठमोळा अभिनेताही दिसणार आहे.

'छावा' सिनेमाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. विकी कौशल, रश्मिका मंदाना आणि अक्षय खन्ना स्टारर हा सिनेमा असून यामध्ये आणखी एक मराठमोठा चेहरा झळकणार आहे. हा अभिनेता नेमका कोण आहे याविषयी जाणून घेऊया.

'छावा' सिनेमात झळकणार मराठी अभिनेता

'छावा' सिनेमात झळकणारा हा मराठमोठा अभिनेता दुसरा-तिसरा कोणी नसून संतोष जुवेकर आहे. विकी कौशल, रश्मिका मंदाना आणि अक्षय खन्नाशिवाय संतोष जुवेकरही महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहे. या सिनेमात संतोष रायाजींच्या भूमिकेत दिसणार आहे.

छावा सिनेमासाठी संतोष जुवेकरने घेतली खास मेहनत

'छावा' सिनेमातील भूमिकेसाठी निवड झाल्यानंतर अभिनेत्याने स्वतःची बॉडी बनवण्यासाठी खूप मेहनत घेतली. त्याने सोशल मीडियावर याविषयी व्हिडिओ शेअर करत सांगितलं. त्याने घाम घालून एक पिळदार बॉडी बनवली. व्हिडिओसोबत त्याने 'मेहनतीला पर्याय नाही!' असं कॅप्शनही दिलं.

दरम्यान, संभाजी महाराज हे मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती होते. स्वराज्यासाठी त्यांनी मुघलांपासून संरक्षण करताना दिलेला लढा अतिशय प्रेरणादायी आहे. 'छावा' या चित्रपटात त्यांचा जीवनप्रवास आणि त्यांनी स्वराज्यासाठी काय काय केलं दाखवण्यात येणार आहे. शिवाजी सावंत यांच्या छावा या कादंबरीवरून प्रेरित होऊन हा सिनेमा तयार करण्यात येत आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी याचं दिग्दर्शन केलं आहे. हा सिनेमा १४ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## बुलढाणा पोलीस दलाने डेव्हलप केला क्विक रिस्पॉन्स अलर्ट सिस्टम युजर ॲप ; ॲपद्वारे मॉक ड्रिलचे प्रात्यक्षिक..



**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यामध्ये कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवल्यास पोलीस यंत्रणा सज्ज राहावे लागते. आणि मनुष्यबळ कमीत कमी वेळेत घटनास्थळी पोहोचवण्यासाठी बुलढाणा पोलीस दलाने 'क्विक रिस्पॉन्स अलर्ट सिस्टम यूजर प' डेव्हलप केला आहे. या पचे आज बुलढाणा शहरातील जयस्तंभ चौकात प्रात्यक्षिक घेण्यात आले या पद्वारे दहा पोलीस अधिकारी १०७ अंमलदार पाच मिनिटात उपस्थित झाले आहे..आणि या पद्वारे जिल्ह्यातील इतर ठिकाणी मॉकटेल घेऊन ॲप द्वारे कायदा व सुव्यवस्था नियंत्रणात आणल्या जाईल अशी प्रतिक्रिया जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी दिली आहे..

# मराठी भाषा पंधरवडानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात 'पुस्तक प्रदर्शन, 'विक्री' आणि 'ग्रंथदान' उपक्रम

## ग्रंथदान करण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन







दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** मराठी भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टीने प्रचार व प्रसार होण्यासाठी राज्यभरात मराठी भाषा पंधरवडा राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात आज 'पुस्तक प्रदर्शन व विक्री'चे आयोजन करण्यात आले होते. यासह 'ग्रंथदान' हा उपक्रम देखील राबविण्यात आला होता. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी प्रदर्शनीला भेट देऊन ग्रंथदान करण्याचे आवाहन केले.

हा उपक्रम जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन भूसंपादन इमारतीमध्ये सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत पुस्तक प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला पुस्तकप्रेमी, वाचनप्रेमीं यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. तसेच 'ग्रंथदान' उपक्रमातमध्ये अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी सहभागी घेऊन १०० हून अधिक पुस्तक दान केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिलहाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# राज्यात आर्टीफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) विद्यापीठाची होणार स्थापना

## कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठासंदर्भात समिती गठीत करण्याचे आदेश - उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विकसित भारत २०४७ मिशनच्या यशस्वी पूर्ततेसाठी आणि भारताच्या ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचालीसाठी शिक्षण आणि तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण भूमिका महत्वाची आहे. त्यामुळे महाराष्ट्रात कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ लवकरच स्थापन करण्यात येणार आहे.यासाठी समिती गठीत करावी अशा सूचना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

आज मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थित आज बैठक पार पडली. या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव, बी वेणूगोपाल रेड्डी, माहिती तंत्रज्ञान प्रधान सचिव पराग जैन-नैनुटीया, उपसचिव अशोक मांडे, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ.प्रमोद नाईक संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ स्थापन करण्यासाठी समिती गठीत करावी अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. अत्याधुनिक संशोधन, उद्योग आणि तंत्रज्ञान यांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना आणि तरुणांना आवश्यक आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचे आणि जागतिक स्पर्धेत टिकवून ठेवणारे ज्ञान उपलब्ध होईल असे विद्यापीठ असावे असेही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी सांगितले.

मंत्री आशिष शेलार म्हणाले, आर्टीफिशियल इंटेलिजन्स हे तंत्रज्ञान भविष्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचं आहे. एआय किंवा संबंधित क्षेत्रांवर प्रभुत्व मिळवल्यास मोठ्या आणि फायदेशीर रोजगाराच्या संधी मिळू शकतात. या



पार्श्र्वभूमीवर देशात पहिल्या एआय विद्यापीठाची स्थापना होईल.

याला अधिक गती देण्यासाठी एक विशेष कृतीदल (टास्क फोर्स) स्थापन करण्यात आला आहे. यामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव, बी वेणूगोपाल रेड्डी, माहिती तंत्रज्ञान प्रधान सचिव पराग जैन-नैनुटीया, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर,उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ.प्रमोद नाईक, परेश पागे यांचा समवेश आहे.

## संक्षिप्त...

### आम्हाला न्याय हवाय,तपासात अडचणी आल्या तर जबाबदारी सरकारची - धनंजय देशमुख




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना पाठीशी घालण्यात येणार नाही असं अजित पवारांनी म्हटलंय. त्यामुळे धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत आज बोलावलेल्या बैठकीत कोणताही ठोस निर्णय झाला नाही यावर धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे.आम्हाला न्याय हवाय त्यामुळे तपासात अडचणी आल्या तर जबाबदारी सरकारची असेल असं धनंजय देशमुख यांनी म्हटलंय.

### न्यायालय परिसरातून 'मकोका'तील आरोपीचे पलायन; वैजापूरमधील घटना

दैनिक आपला विदर्भ


**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** दरोडा व मकोका गुन्ह्यात अटकेत असलेला २० वर्षीय आरोपी पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार झाला आहे. ही घटना वैजापूर न्यायालयाच्या आवारात आज दुपारच्या सुमारास घडली. धीरज भरम भोसले (२०वर्षे, रा. पडेगाव, कोपरगाव, अहिल्यानगर) असे पसार झालेल्या आरोपीचे नाव आहे. आज पोलिसांनी ९ आरोपींना वैजापूर सत्र न्यायालयात हजर केले होते. सत्र न्यायालयात हजेरीनंतर आरोपी गाडीत होते. आरोपी धीरज भोसले हा हातकड्यांसह गाडीच्या मागील दरवाजातून पळून गेला. पोलिसांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र तो सापडू शकला नाही. त्याच्या विरोधात वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांची पथके आरोपीचा शोध घेत आहेत.



मकोका सारख्या गंभीर गुन्हातील आरोपींन साठी ६ पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता त्यातील एक कर्मचारी हे गैरहजर होते ९ आरोपींसाठी फक्त ५ कर्मचारी हे बंदोबस्तात होते नियमा नुसार अश्या गंभीर गुन्हातील आरोपींना ने आण करण्यासाठी शस्त्र धारी एक तीनचा गार्ड असतो परंतु येथे कर्मचा-यांचे कमतरतेची संधी साधून आरोपींने पलायन केले.

### मलकापूर जवळ मुंबईच्या दक्षता पथकाची अवैध बायोडिझेल पंपावर मोठी कारवाई





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातून जाणाऱ्या धुळे - नागपूर या राष्ट्रीय महामार्गावर मलकापूर ते खामगाव दरम्यान मोठ्या प्रमाणात बायोडिझेलचे पंप उभारून बायोडिझेलची अवैध विक्री केली जात आहे. स्थानिक प्रशासनाचा याकडे जाणून बुजून दुर्लक्ष असल्याचा आरोप नेहमी होत असतो. काल २७ जानेवारीला मुंबई येथील राज्यस्तरीय दक्षता पथक व बुलढाणा पुरवठा विभागाने मलकापूर तालुक्यातील तालसवाडा तसेच रणथम येथे २ अवैध बायोडिझेल पंपावर धाड टाकून दोन्ही पंप सील केले तसेच १४ जणाविरुद्ध दसरखेड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून बायोडिझेल सदृश्यने भरलेले २ टँकर जप्त करण्यात आले आहे.या कारवाई दरम्यान ४ आरोपींना अटक देखील करण्यात आले आहे. या कारवाईमुळे बायोडिझेल माफियांचे धाबे दणाणले आहे. डीजल पेट्रोल सदृश्य ज्वलनशील पदार्थ अवैधरित्या विक्री करणाऱ्यावर यापुढे देखील धडक कारवाई करण्यात येईल, अशी माहिती आज २८ जानेवारीला सायंकाळी ६ वाजता बुलढाणा जिल्हा पुरवठा अधिकारी गजानन टेकाळे यांनी दिली आहे.

## बीबी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप पाटील साहेब यांनी केली जिल्हा परिषद शाळेची पाहणी



दैनिक आपला विदर्भ

**बीबी/प्रतिनिधी** :जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती पाहून पाटील साहेब यांनी केले शिक्षकांचे अभिनंदन दैनिक आपला विदर्भ लाईव्ह प्रतिनिधी --अशोक मुंढे जि प प्रा शाळा महार चिकना येथे शालेय सुरक्षा संदर्भात सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील साहेब पोलीस स्टेशन बिबी यांनी भेट दिली भेटीदरम्यान शालेय परिसर विद्यार्थी समस्या सीसीटीव्ही कॅमेरे या संदर्भात चर्चा करण्यात येऊन शालेय सुरक्षा संदर्भात माहिती विद्यार्थ्यांना दिली भेटीदरम्यान त्यांचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक श्री अंभोरे सर यांनी पुष्पगुच्छ देऊन केले तसेच वर्ग पहिली ते सातवीच्या मुलांसोबत हितगुज करून त्यांना सुरक्षाविषयक माहिती दिली तसेच मुलांची शैक्षणिक प्रगती बघून समाधान व्यक्त केले स्वतः साहेब जिल्हा परिषद शाळेत शिकून अधिकारी झाले हे ऐकून विद्यार्थ्यांनाही स्वतः च्या भविष्यावर विश्र्वास निर्माण झाला भेटी शेवटी शालेय विद्यार्थी यश पारदधे, नागेश पारधे, प्रेम सदावर्ते, आनंद साबळे, वैष्णवी ढाकणे, पूनम मुंडे, शिवकन्या ताकतोडे, पूनम मांटे, शिवकन्या तांदुळे, धनश्री ढाकणे, श्रद्धा पारधे, प्रीती साबळे, आदी सर्व शालेय विद्यार्थी उपस्थितानां मराठी , ईंग्रजी विषयाचे वाचन करुन दाखवले यावेळी श्री बालाजी लोखंडे सहशिक्षक व श्री पी.व्हि.क्षीरसागर सहशिक्षक यांनी साहेबांचे भेटीदरम्यान पाटील साहेबांचे आभार व्यक्त केले

## एस. टी. भाडे वाढ विरोधात आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) कडून चक्का जाम आंदोलन

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अनेक मोठे मोठे आश्वासने देऊन महायुती सरकार सत्तेत आलं. मात्र सत्तेत आल्यानंतर त्यांनी सर्वसामान्यांची काम करण्याऐवजी आता त्यांची छळवणूक सुरू केली आहे. एकीकडे लाडक्या बहिणींचे लाड करायचे तर दुसरीकडे एसटीची भाडे वाढ करायची एसटीचे भाडे वाढ ही सर्व सामान्यांचे कंबरडं मोडणारे असल्याच म्हणत या भाडेवाडीला विरोध करत आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे कडून बुलढाणा मध्यवर्ती बस स्थानकासमोर चक्काजाम आंदोलन करण्यात आले. यावेळी असंख्य शिवसैनिकांना ताब्यात घेण्यात आले.




## प्रेस फोटोग्राफर निनाजी भगत, रविकिरण टाकळकर, वाईल्ड लाईफ फोटोग्राफर डॉ. गजेंद्र निकम यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतून संपादित केलेल्या मातृतीर्थ बुलढाणा या कॉफी टेबल बुक निर्मितीमधील योगदानासाठी बुलढाण्यातील प्रेस फोटोग्राफर निनाजी भगत, रविकिरण टाकळकर, वाईल्ड लाईफ फोटोग्राफर डॉ. गजेंद्र निकम यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देवून प्रजासत्ताक दिनी सन्मान करण्यात आला.

जिल्ह्यातील नावलौकिक असलेल्या निसर्गरम्य ठिकाणे, ऐतिहासिक स्थळे व पुरातनवास्तु, हेमाडपंथी मंदिरे तसेच पुरातन इतिहास जतन व संवर्धन करीत असलेल्या व इतर स्थळांची माहिती राज्यातील तसेच देशातील नागरिकांना व्हावी व पर्यटनाच्या संखेत वाढ व्हावी या उद्देशाने जिल्हाधिकारी बुलढाणा कार्यालयाच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या मातृतीर्थ बुलढाणा जिल्हा या कॉफी टेबल बुक मध्ये बुलढाण्यातील प्रेस फोटोग्राफर निनाजी भगत, रविकिरण टाकळकर वाईल्ड लाईफ फोटोग्राफर डॉ. गजेंद्र निकम, कीटक अभ्यासक फोटोग्राफर प्रा.आलोक शेवडे यांनी टिपलेल्या छायाचित्रांचा समावेश आहे.

या छायाचित्रांच्या समावेशामुळे हे कॉफी टेबल बुक सुंदर व आकर्षक बनले असून या योगदानासाठी जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी या छायाचित्रकारांना प्रातिनिधीक स्वरुपात सन्मानपत्र देऊन प्रजासत्ताक दिनी सन्मानित केले. या कॉफीटेबल बुकमध्ये मनिष झिमटे, सागर राणे, रोहित शर्मा, सुनील वाकोडे, चेतन राठोड, विजय पाटील, ऋषिकेश कुळकर्णी यांनी टिपलेल्या छायाचित्रांचाही समावेश आहे. या सर्व छायाचित्रकार बांधवांचे जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले.

## दिव्यांगांसाठी फिरत्या वाहनावरील दुकान; ६ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज मागविले

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळामार्फत दिव्यांग व्यक्तींना हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान मोफत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छूक व गरजू दिव्यांगांनी दि. ६ फेबुवारी २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

दिव्यांग स्वावलंबी होण्यादृष्टीने दि. १० जून २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल ऑन ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करुन देण्यासाठी योजनेला मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, मर्यादित यांच्या स्तरावरुन होणार आहे.

दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे, व्यक्तींचे आर्थिक व सामाजिक पुनर्वसन करणे. सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या परिवार किंवा कुटुंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे हा योजनेचा उद्देश आहे.

अर्ज नोंदणी करण्यासाठी पोर्टल सुरु करण्यात आले असून इच्छूक व गरजू दिव्यांगांनी https://register.mshfdc.co.in या लिंक वर ऑनलाईन अर्ज दि. ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. सदर योजनेचा अधिकाधिक दिव्यांगांनी लाभ घ्यावा.

## दहावी व बारावी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज आपले सरकार पोर्टलवरच ऑनलाईन स्विकारले जाणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** :दहावी व बारावी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या आपले सरकार प्रणालीद्वारे केवळ ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्याबाबत क्रीडा आयुक्त सुचित केले आहे. जिल्ह्यातील सर्व खेळाडू, विद्यार्थी, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपले सरकार पोर्टलवर या वर्षीपासून सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.

सन २०२३-२४ पर्यंतची ग्रेस गुण प्रक्रिया काही मानवी उणीवांमुळे हे काम अचुक व दोषरहीत होणे क्लिष्ट होत होती व त्याचा फटका विद्यार्थ्यांना त्यांच्या गुण न मिळण्याने बसत होता. या प्रश्र्नावर तोडगा आणि सदर सवलत गुण प्रक्रिया निर्दोष करण्यासाठी, या वर्षीपासून म्हणजेच २०२४-२५ यावर्षापासून ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रिया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातील सर्व खेळाडू विद्यार्थी / जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार अॅपद्वारे या वर्षीपासून सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. त्यासंदर्भात कोणताही खेळाडू जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा येथे ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करणार नाही व अंशा प्रकारचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा यांचेकडून स्विकारल्या जाणार नाही याची नोंद बुलढाणा जिल्ह्यातील सर्व खेळाडू, विद्यार्थी, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहें.

# एसटी महामंडळाने तिकीटाचे दर वाढवले, भाडेवाढ रद्द करण्यासाठी ठाकरे गट आक्रमक

## आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात मेहकर येथे तीव्र आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मएसटी महामंडळाने तिकिटाचे दर वाढवल्याने नागरिकांना मोठी झळ बसणार आहे. भाडेवाढ रद्द करण्यासाठी मेहकर आगारात एसटी भाडेवाढ च्या निर्णया विरोधात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार सिद्धार्थ खरात व उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे यांच्या प्रमुख नेतृत्वात बस स्थानक परिसरात निषेध आंदोलन करुन सरकार विरुद्ध घोषणा देत निषेध केला.

एसटी भाडेवाडीच्या विरोधात ठाकरे गट आक्रमक झाला आहे .एकीकडे लाडक्या बहिणींना १५०० रुपये दिले जातात .तर दुसरीकडे एसटी बसची भाडे वाढ करून सर्वसामान्य जनतेच्या खिशाला कात्री लावण्याचे काम सरकार सेकरत असल्याचा आरोप सेनेच्या कार्यकर्त्यांनी केला २३ जानेवारीला परिवहन प्राधिकरणाची बैठक पार पडली असून या बैठकीत एसटी भाडेवाढीचा निर्णय झाला आहे. अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली एसटी दरवाढीबाबत १४.९५ टक्के इतकी वाढ झाली आहे.

जिल्ह्यात एसटी भाडेवाढीच्या निषेधार्थ उबाठा गटाकडून संपूर्ण महाराष्ट्रात चक्का जाम आंदोलन करण्यात येत आहे. तर आमदार सिद्धार्थ खरात यांच्या प्रमुख नेतृत्वात बस स्थानक परिसरात निषेध आंदोलन केले आहे. दरम्यान, एसटी भाडेवाडीच्या विरोधात ठाकरे गट आक्रमक झाला असून ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांनी बास्थानाकासमोर आंदोलन केले.एकीकडे लाडक्या बहिणींना १५०० रुपये दिले जातात. तर दुसरीकडे एसटी बसेसचे भाडेवाढ करून सर्वसामान्य जनतेच्या खिशाला कात्री लावण्याचे काम हे सरकार करत आहे असा आरोप आमदार सिद्धार्थ खरात व शिवसैनिकांनी केले आहे. शासकीय विश्रामगृह ते मेहकर आगार पर्यंत शेकडो कार्यकर्त्यांनी मोटार सायकल रॅली काढून आगार व्यवस्थापक यांना निवेदन दिले





### आमदार सिद्धार्थ खरात यांचा चक्का जाम आंदोलनाचा इशारा

एसटी ची भाडेवाढ करण्याचा सरकार निर्णय हा सर्व सामान्य जनतेच्या खिशाला परवडनारा नसून सुध्दा हा चुकीचा निर्णय घेण्यात आलाय. एसटीची ही भाडेवाढ अतिशय अन्यायकारक आहे. एसटी प्रवाशांच्या व्यथा जुलमी सरकार काय माहित. एसटीही शहरी आणि ग्रामीण भागात प्रवासाचं मुख्य साधन आहे. त्यातच जर १५ टक्के वाढ होत असेल तर त्याला विरोध करण्याची भूमिका शिवसेनेनं घेतली आहे जर भाडेवाढ रद्द झाली नाही तर बसस्थानकाच्या रस्त्यावरून मुख्य रस्त्यावर बसू, चक्काजाम करू असा इशारा ही आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिला आहे आजचे हे आंदोलन वादळापूर्वीची शांतता आहे.जर भाडेवाढ झाली नाही तर सर्व रस्ते बंद करू चक्काजाम करू शिवसेना स्टाईलने आंदोलन करून सरकारला वेठीस धरू असा सूचक ईशाराही आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिला आहे.

त्याच बरोबर आठ दिवसात एसटी ची भाडेवाढ रद्द करावी अन्यथा या पुढं देखील दर वाढी विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी दिला आहे.या वेळी उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, दिपक मापारी, रमेश बापू मापारी, किसन पाटिल, नारायण बळी, स्वप्नील हाडे, गोपाल खोतकर, ऋषि पागोरे,मेहकर शहर अध्यक्ष किशोर भाऊ गारोळे,ड आकाश घोडे, गजानन जाधव, विजय मोरे, योगेश कंकाळ, रवि गिते,जीवन घायाळ, ऋषिकेश जगताप,परमेश्र्वर दहातोंडे, श्रीकांत मादनकर, समाधान ठाकरे, गजानन राठोड, महादेव उर्फ बाळूभाऊ पारवे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### बुलढाण्यात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त पुस्तक प्रदर्शन व विक्री





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** मराठी भाषा पंधरवडा निमित्त मराठी भाषा संवर्धन करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा आणि जिल्हा ग्रंथालय कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आज जिल्हाधिकारी कार्यालय परिसरामध्ये पुस्तक प्रदर्शन व विक्रीचे उद्घाटन अप्पर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांच्या हस्ते झाले. यावेळी आपली मराठी भाषा समृद्ध आणि अखंडित राहावी आपले वाचन वाढावे आणि आपल्या मराठी भाषेला एक नवीन संजीवनी द्यावी. आपल्या दैनंदिन जीवनात मराठी भाषेचा वापर करावा असे आवाहन यावेळी करण्यात आले आहे. पुस्तक प्रदर्शन हे दि. १४ ते २८ जानेवारी, २०२५ दरम्यान सुरु राहणार आहे.

### गण गण गणात बोतेच्या गजरात पायी पालखी सोहळा





दैनिक आपला विदर्भ

**बेलगाव/प्रतिनिधी :** २७ सालोबात प्रमाणे याही वर्षी गेल्या आठ वर्षापासून जय हनुमान भजनी मंडळ बेलगाव येथून चालवत आलेल्या पायी पालखी सोहळा बेलगाव ते शेगाव आज दिनांक २७ रोजी बेलगाव येथून श्रीची पालखी रवाना झाली दि २७ एक ते दि १ दोन २ रोजी शेगाव मध्ये पालखीचे आगमन होईल जय हनुमान भजनी मंडळ वसंत गजानन महाराज सेवा समिती व गावकरी मंडळी यांच्या सहकार्याने गेल्या अनेक वर्षापासून पायी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात येतात त्यामध्ये भजनी मंडळ महिला लहान थोर त्यांना पांढरे पोशाख तर महिलांना पिवळी साडी मध्ये परिधान करून दिंडीमध्ये प्रवेश करावा लागतो त्यामध्ये शिस्तबद्ध पाळल्या जाते गावातील भाविक यामध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतात अनेकांचे ट्रॅक्टर गाड्या व रस्त्यामध्ये चहापाणी अन्नदाते यामध्ये अनेक भाविक भक्त सहभागी होऊन दिंडीला सहकार्य करतात

### एसटी भाडेवाढ रद्द करा या मागणीसाठी उद्धव ठाकरे गटाचे चक्का जाम आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :**अकोल्यात एसटी भाडेवाढ रद्द करा, या मागणीसाठी उद्धव ठाकरे गटाने रस्त्यावर ठिय्या येत चक्का जाम आंदोलन केले. जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांच्या नेतृत्वात अकोल्यातल्या धिग्रा चौकात हे चक्का जाम आंदोलन करण्यात आले असून या आंदोलनावेळी ठाकरेंच्या सैनिकांनी एसटीच्या चाकातील हवा सोडत सरकारचा निषेध व्यक्त केला आहे. तर आंदोलना दरम्यान सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी ही करण्यात आली असून एसटी भाढेवाढ आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्र्नांसाठी हे आंदोलन करण्यात आले आहे.



## शेतकऱ्यांनी ॲग्रिस्टॅक योजनेचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**फार्मर आयडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शासकीय योजनाचा मिळणार लाभ**

दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी माहिती संच निर्मिती आणि शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी तयार करण्यात येत आहे. यासाठी प्रशासनामार्फत विशेष मोहिम राबविण्यात येत असून शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या सीएससी केंद्रावर नोंदणी करुन योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषि व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेताचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री) तयार करण्यात येणार असून उपलब्ध आकडेवारीच्या आधारे शेतकरी बांधवांना विविध योजनांचा लाभ वितरीत करणे सुलभ होईल. तसेच लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरणाची आवश्यकता राहणार नाही. ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत आपला सातबारा आधारला लिंक करायचा आहे. जेणेकरून तुम्हाला एक फार्मर आयडी मिळेल. फार्मर आयडी बनवला नाही तर पिक विमा, पीक कर्ज, पीएम किसान व विविध पिक अनुदान यांचा लाभ मिळणार नाही.

फार्मर आयडी बनवण्यासाठी आधार कार्ड, मोबाईल क्रमांक जो आधार व बँक खात्याशी लिंक व सातबारा किंवा नमुना ८ या कागदपत्राची आवश्यक आहे. सदर कागदपत्रे घेवून आपल्या जवळच्या नागरी सुविधा केंद्र नोंदणी करावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय मुख्य समन्वयक समाधान गायकवाड यांनी केले आहे.

## एसटी भाडेवाडीच्या संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उमरखेड येथे चक्काजाम आंदोलन व जाहीर निषेध



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष उमरखेड शहर, ढाणकी शहर व तालुक्याच्या वतीने आज दिनांक २८-१- २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ व महाराष्ट्र शासनाद्वारे १४.९७% एवढी भरमसाठ दरवाढ केल्याच्या निषेधार्थ चक्काजाम आंदोलन करण्यात आले.महाराष्ट्र शासन व परिवहन मंत्री यांचा जाहीर निषेध करण्यात आला व झालेली दरवाढ ही त्वरित मागे घेण्यात यावी याकरिता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे आगार प्रमुख यांच्या मार्फत शासनाला निवेदन देण्यात आले.

भरमसाठ एसटी दरवाढ झाल्यामुळे सर्वसामान्य माणसाच्या खिशाला कात्री लागणार आहे. सर्वच जीवनावश्यक वस्तूंचे भाव सुद्धा वाढणार आहेत,शेतकऱ्याच्या मालाला आतापर्यंत हमीभाव मिळाला नाही. शेतकऱ्यांच्या मालाला सुद्धा भाव मिळालाच पाहिजे, झालेली दरवाढ ही भरमसाठ असल्यामुळे कमी झालीच पाहिजे या प्रकारच्या घोषणा देऊन चक्काजाम आंदोलन करून बस स्टँड परिसर शिवसैनिकांनी दणाणून सोडला.

याप्रसंगी शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख ॲड.बळीराम मुटकुळे, शिवसेना तालुकाप्रमुख सतीश नाईक,तालुका सचिव संतोष जाधव, शहर प्रमुख गजेंद्र ठाकरे,तालुका संपर्कप्रमुख निलेश जैन,ढाणकी शहर प्रमुख बंटी जाधव, ज्येष्ठ शिवसैनिक तानाजीराव शिंदे,युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख नितीन शिंदे, युवा सेनेचे तालुका प्रमुख संभाजी गोरडकर, श्री शैलेश भोयर, विजय वैद्य, सुंदरकांता वासमवार ,बालाजी लोखंडे,विजय पोंगाणे,सुमित नाईकवाडे, गजानन पवार, बंडूभाऊ शिंदे, गोपीचंद दोडके, अनिल कांबळे, अनिल कदम, अतुल पराते, पिंटू सुरोशे, प्रफुल गोरडकर,रवी कदम, प्रवीण कुंटे, ज्ञानेश्वर लोखंडे, अभिषेक कदम, गंगाधर शिंदे, नरेश कुकडे, मुमताज खान, अख्तर खतीब, विजय शिंदे, नरेश पवार,सुरेश कल्याणकर, श्रीकांत शहा,शैलेश आसोले. श्री उत्तम कदम विभाग प्रमुख मुळावा सर्कल तसेच असंख्य शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक बांधव उपस्थित होते.

## जिजामाता महाविद्यालयात ड्रोन प्रात्यक्षिक; जिल्हाधिकारी कार्यालय, कॉनफ्लाय डायनॅमिक्स यांचा संयुक्त उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :**श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित जिजामाता महाविद्यालयात प्रगत ड्रोन तंत्रज्ञानाच्या कृषी उपयोगाचे प्रात्यक्षिक यशस्वीरित्या सादर करण्यात आले. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय आणि कॉनफ्लाय डायनॅमिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कंपनीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कृणाल कस्तुरे यांच्या नेतृत्वाखाली हे प्रात्यक्षिक पार पडले.





**आधुनिक कृषी पद्धतींना प्रोत्साहन**

या प्रात्यक्षिकाचा उद्देश शेतकऱ्यांसमोरील मजूर टंचाई आणि औषध फवारणीसाठी लागणाऱ्या मोठ्या खर्चासारख्या प्रमुख समस्यांचे निराकरण करणे हा होता. ड्रोनच्या वापरामुळे श्रमांवरील अवलंबित्व कमी होऊ शकते, वेळ वाचतो, आणि कीटकनाशक फवारणी अधिक कार्यक्षमतेने केली जाते. खरीप आणि रब्बी हंगाम तसेच फळबागांवर ड्रोनचा वापर रोग नियंत्रण आणि पीक व्यवस्थापनासाठी अत्यंत फायदेशीर ठरतो.

**जिल्हा प्रशासनाचा पाठिंबा**

आधुनिक कृषी पद्धतींना प्रोत्साहन देण्याचे महत्त्व लक्षात घेऊन डॉ. किरण पाटील, जिल्हाधिकारी बुलढाणा, यांनी कृषी विभागाला जिजामाता महाविद्यालयाच्या विस्तृत मैदानावर हे प्रात्यक्षिक आयोजित करण्याचे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने २५ जानेवारी रोजी झालेल्या या कार्यक्रमात कॉनफ्लाय डायनॅमिक्सचे कृणाल कस्तुरे, निलेश बाहेकर, कोमल शेळके, आणि प्रताप राजपूत यांनी ड्रोन प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी शेतकरी कुटुंबातील बहुसंख्य विद्यार्थी, महाविद्यालयाचे प्राध्यापक, आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश गवई आणि बुलढाणा तहसीलचे निवृत्त नायब तहसीलदार प्रकाश डब्बे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

**ड्रोन तंत्रज्ञानाचा लाभ कसा घ्यावा**

ड्रोनच्या किंमती, शासकीय अनुदान, आणि तांत्रिक मार्गदर्शनासाठी शेतकरी आणि इच्छुक व्यक्तींना चिखली रोडवरील राज संभाजी टॉवर येथील कॉनफ्लाय डायनॅमिक्सच्या कार्यालयाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले. अधिक माहिती आणि सहाय्यासाठी कृणाल कस्तुरे यांच्याशी थेट संपर्क साधण्याचे सुचविण्यात आले.

**कृषी क्षेत्रासाठी तंत्रज्ञानाचा नवा मार्ग**

ड्रोन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे फवारणीसाठी लागणाऱ्या वेळेची मोठी बचत होऊ शकते आणि औषधांचे समप्रमाणात फवारणी केल्याने पिकांवरील प्रभावी नियंत्रण शक्य होते. यामुळे उत्पादकता वाढण्यासोबतच उत्पादनाचा खर्चही कमी होतो. हा उपक्रम केवळ विद्यार्थ्यांसाठीच नाही तर शेतकऱ्यांसाठीही प्रेरणादायी ठरला आहे. या प्रात्यक्षिकामुळे जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय आणि कॉनफ्लाय डायनॅमिक्स यांच्या या संयुक्त उपक्रमामुळे कृषी क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची दिशा दाखवत एक नवीन अध्याय सुरू झाला आहे.